

॥असाध्य ते साध्य करिता सायास॥

Council of Education's

# NIGHT COLLEGE OF ARTS AND COMMERCE, KOLHAPUR

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

NAAC Reaccredited with 'A' Grade (CGPA-3.12)

Date: 10/10/2025

## Activity Report on 'MOU: Maharashtra Andhashraddha Nirmulan Samiti & Maharashtra Vivek Vahini'

Organized by

**Vivek Vahini**

2025 - 2026

| | |
|---|---|
| **Date of Activity Organized** | 10/10/2025 |
| **Name of the Coordinator** | Dr. Arun Shinde |
| **Names of the Expert or Resource persons** | Office Bearers of MANS and Vivek Vahini |
| **No. of Participant (Students + staff)** | Committee Members |
| **Objectives of the Activity** | To establish a formal partnership for social reform and the eradication of superstition. |
| **Outcomes of the Activity** | Formalized a framework for collaborative rationalist activities and awareness programs. |

**In charge of Committee**

PRINCIPAL,
NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE,
KOLHAPUR

Scanned with OKEN Scanner

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DY 240496

श्री. चंद्रकांत सितारा‍म पिंपळे, परवाना क्रमांक ११९/८८, महालक्ष्मी चेंबर्स, कोल्हापूर.

-9 OCT 2025

दिनांक — वि.क्र. 2809 मुद्रांक शुल्क रक्कम - 500

दस्त नोंद करणार आहे का-होय/नाही, नोंदणी होणारे दु.नि.कार्या.--------

दस्ताचा प्रकार / अनुच्छेद क्रमांक / कारण --------MOU-----------

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता नाईट कॉलेज कोल्हापूर

दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता --------------------------

हस्ते नांव व पत्ता ---- [illegible] शिंदे -------------------

मोबदला रक्कम - मिळकतीचे वर्णन ---------------

मुद्रांक विक्रेत्याची सही /

परवाना तसेच मुद्रांक विक्री ठिकाण नांव व पत्ता चंद्रकांत सितारा‍म पिंपळे

(स्टँप व्हेंडर) ला. नं. ११९/८८,

फोन नं. २६०१०३२ महालक्ष्मी चेंबर्स, शॉप नं. ई-२८ कोल्हापूर

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही /

TREASURY OFFICER KOLHAPUR

-3 OCT 2025

STAMP HEAD CLERK TREASURY KOLHAPUR

# सामंजस्य करार

## (MEMORANDUM OF UNDERSTANDING)

## नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

## आणि

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूर जिल्हा शाखा

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूरची स्थापना थोर स्वातंत्र्यसेनानी पद्मश्री देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी १९७१ साली केली. दिवसा काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळी शिकण्यासाठी व स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी नाइट कॉलेज स्थापन केले गेले. कला व वाणिज्य शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण येथे दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या नाइट कॉलेजने आपला स्वतंत्र ठसा निर्माण केला आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी ९ ऑगस्ट १९८९ रोजी केली. अंधश्रद्धामुक्त, विवेकी समाजनिर्मितीसाठी बांधील असलेल्या कृतिशील कार्यकर्त्यांच्या या संघटनेने पुढील पंचसूत्री स्वीकारलेली आहे – १. शोषण करणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे २. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार प्रसार आणि अंगीकार करणे ३. धर्माची विधायक, कृतिशील, कालसुसंगत चिकित्सा करणे ४. संत आणि समाजसुधारकांचा वारसा आणि संविधानाचा मूल्य आशय कृतिशील करणे ५. व्यापक परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेणे. या पंचसूत्रीवर अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्रभर तसेच भारताच्या विविध भागांत कार्यरत आहे. 'राष्ट्राचे भवितव्य शाळा-महाविद्यालयांमधून घडते', या जाणिवेतून समिती महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी यांच्या बरोबर विविध उपक्रमांमधून विवेकी समाजनिर्मितीसाठी कार्यरत आहे.

**वरील दोन्ही संस्था परस्पर सहयोगाने, सामूहिकपणे विविध उपक्रम राबविण्यासाठी दिनांक 10 ऑक्टोबर 2025 रोजी सामंजस्य करार करीत आहेत.**

- **या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत –**

१. विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार-प्रसार करणे

२. आधुनिक, विज्ञाननिष्ठ, अंधश्रद्धामुक्त समाज निर्माण करणे

३. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सा, संशोधन वृत्ती, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता, स्वतंत्र दृष्टिकोन, अभिव्यक्ती कौशल्ये विकसित करणे.

४. स्त्री-पुरुष समानता, लिंग समभाव, पर्यावरणपूरक जीवनशैली, आरोग्य, विवेकवाद यांसंदर्भात जाणीवजागृती करणे

५. भारतीय संविधानाला अभिप्रेत आधुनिक, विज्ञाननिष्ठ, ज्ञानाधिष्ठित व्यक्ती व समाज निर्माण करणे.

६. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे

७. दोन्ही संस्थांच्या उद्दिष्टांनुरूप आवश्यक ते उपक्रम राबविणे



Scanned with OKEN Scanner

- **सामंजस्य कराराच्या माध्यमातून राबविण्याचे उपक्रम–**

१. विवेक वाहिनी

२. वैज्ञानिक दृष्टिकोन

३. संविधान साक्षरता व संविधानिक मूल्यांचा प्रचार–प्रसार

४. जोडीदाराची विवेकी निवड

५. लिंग समभाव

६. मानसिक आरोग्य व्यवस्थापन

७. विवेकी व्यक्तिमत्त्व विकास

८. पर्यावरणपूरक सण–उत्सव

९. व्यसनमुक्ती

१०. अंधश्रद्धा निर्मूलन

११. सांस्कृतिक अभिव्यक्ती

१२. विवेक जागर

१३. प्रशिक्षण इत्यादी

- **माध्यमे**

१. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, व्याख्याने, प्रदर्शने, पथनाट्ये, अभ्यास सहली, विविध स्पर्धा वगैरे उपक्रम राबविणे.

२. संविधान साक्षरता, लिंग समभाव, मानसिक आरोग्य निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, मानवी साखळी, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविणे.

३. व्यसनमुक्तीसंदर्भात प्रबोधन करणे. व्यसनांमुळे होणाऱ्या आजारांबाबत जागृती निर्माण करणे.व्यसनमुक्ती व दारुबंदी चळवळ राबविणे. गुटखा, तंबाखू मुक्तीसाठी विशेष प्रयत्न करणे.



Scanned with OKEN Scanner

४. पर्यावरणपूरक जीवनपद्धती निर्माण करण्यासाठी पर्यावरणपूरंक सण–उत्सव, पर्यावरणपूरक गणपती, फटाक्यांविरोधात मोहीम, प्लास्टिक बंदी, इंधन वाचवा, प्रदूषण मुक्त वाहतुक इत्यादी उपक्रम राबविणे. सर्व प्रकारच्या प्रदूषणापासून मुक्ततेसाठी कृतिशील प्रयंत्न करणे.

५. अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य, पर्यावरण, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा अभ्यास, संशोधन व प्रसार करणे.

६. विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक समस्या, लैंगिक समस्या आदींचा अभ्यास करून त्यांच्यामध्ये आरोग्य साक्षरता निर्माण करणे.

७. दोन्ही संस्थांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे.

८. मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रबोधन करणे.

९. विवेकवाहिनीच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यासाठी बैठका, चर्चा, विचारविनिमय करून निर्णय घेणे. वर्षभराचे नियोजन करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे.

१०. शासन, सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालये यांच्या सहयोगाने विविध उपक्रम राबविणे इत्यादी.

- आर्थिक व कायदेशीर बाबी

१. सदर सामंजस्य करार दोन्ही संस्थांचे पदाधिकारी परस्पर सहमतीने व कायदेशीररीत्या बांधील राहून करीत आहेत.

२. सामंजस्य करारातील उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यासाठी व वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी दोन्ही संस्थांचे पदाधिकारी रीतसर बैठका घेऊन व त्यांच्या नोंदी ठेवून अंमजबजावणी करतील. प्रत्येक कार्यक्रमाची माहिती परस्परांना दिली जाईल. त्या संदर्भातील कागदपत्रांचे आदानप्रदान केले जाईल.

३. सामंजस्य करारांतर्गत उपक्रमासाठीचा खर्च त्या त्या संस्थेने स्वतः करायचा आहे. संयुक्तपणे खर्च करावयाचा असल्यास त्या संदर्भात पदाधिकारी बैठकीत निर्णय घेतील.

४. कोणत्याही संस्थेला एकतर्फी करार संपुष्टात आणता येणार नाही.

५. करार संपुष्टात आणणे, कराराचे नूतनीकरण करणे यासाठी साठ दिवसांची पूर्वसूचना देऊन विशेष बैठकीचे आयोजन केले जाईल व त्या नंतर कायदेशीर बाबींची पूर्तता करून कराराबाबत निर्णय घेता येईल.

६. सामंजस्य कराराची उद्दिष्टे व अंमलबजावणीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे सर्व अधिकार या कराराची अंमलबजावणी करणाऱ्या दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.



Scanned with OKEN Scanner

७. सदर सामंजस्य कराराचा कालावधी आज **दिनांक 10 ऑक्टोबर 2025 पासून दिनांक 09 ऑक्टोबर 2035 पर्यंत म्हणजे दहा वर्षांचा** आहे.

८. सदर कराराची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य वा त्यांनी नियुक्त केलेले प्राध्यापक/समन्वयक तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष/प्रधान सचिव वा त्यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी संयुक्तपणे काम पाहतील.

९. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटींशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.

समन्वयक

प्राचार्य

प्राचार्य
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स,
कोल्हापूर

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

अध्यक्ष

प्रधान सचिव

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूर

**दिनांक 10 ऑक्टोबर 2025**



Scanned with OKEN Scanner